# महाराष्ट्र शासन
# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
# राज्य आरोग्य हमी सोसायटी

'जीवनदायी भवन', राज्य कामगार विमा रुग्णालय आवार, गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८

दूरध्वनी क्र ०२२- २४९९९२०३/०४/०५

राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयात प्रशासकीय बाबी हाताळण्यासाठी अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नामिकासूची तयार करण्यात येत आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी हे वैद्यकीय अधिकारी व प्रशासकीय अधिकारी या कंत्राटी तत्त्वांवरील पदांसाठी नामिकासूची तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे अर्हताधारक व अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागवित आहेत.

आवश्यक अर्हता, अनुभव व वयोमर्यादा:

| No. | Name of the post | Qualification | Less than | Experience | No. of the post | Salary |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Medical Consultant | A) MBBS registered with concerned Medical council and with an experience of 20 years in Health Sector.<br>B) Retired Govt. Officer Will be Preferred.<br>C) PG degree will be preferred. | 65 years. | 20 years Equivalent to rank of Dy. Director/DHO at the time of retirement in case of Govt. officials. | 02 | For Retired. Govt. officials salary as per General Administration Dept. GR dated 17.12.2016<br>For Non Govt. officer salary Rs.50000/- p. m. |
| 2 | Administrative Officer | A) Retired Govt. Officer – (Class 2 Gazetted) From Maharashtra finance and account services.<br>B) Preference will be given to officers with work experience in Accounts/Administration/Establishment | 65 years. | More than 20 years total service experience. | 01 | As per GR from General Administration Department Dated 17/12/2016 |

**सर्वसाधारण अटी व शर्ती:**

१) सदर विवक्षित कामांसाठी नियुक्ती कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांकरिता राहील. सेवा समाधानकारक असल्यास पुढील ११ महिन्यांच्या कराराचे नुतनीकरण करण्यात येईल.

२) नियुक्तीसाठी पात्र उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवाराने त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र रुजू होतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

३) उमेदवाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसणे किंवा अशा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसणे आवश्यक आहे.

४) वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता निवड होणाऱ्या सेवानिवृत्त उमेदवारास सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१७ डिसेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील व सेवानिवृत्त अधिकारी उपलब्ध नसल्यास बिगर शासकीय उमेदवारास प्रति महिना रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) इतके मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील

५) अर्जदार हा मुंबई किंवा मुंबई लगतच्या परिसरातील रहिवासी असावा.

६) नियुक्तीचे ठिकाण वरळी, मुंबई येथे राहील.

७) प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी पाचारण करण्यात येईल.

८) नियुक्त करण्यात येणाऱ्या उमेदवारांस कार्यालयात येण्या-जाण्याचा खर्च स्वत: करावा लागेल.वाहन पुरविले जाणार नाही.

९) उपरोक्त पदसंख्येत आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

इच्छुक उमेदवारांनी जाहिरातीच्या दिनांकापासून १५ दिवसांमध्ये या कार्यालयाकडे hr.manager@jeevandayee.gov.in या ईमेलवर आपल्या बायोडेटासह अर्ज सादर करावा. तसेच पोस्टाने अर्ज पाठवावयाचा असल्यास वर नमुद केलेल्या पत्यावर अर्ज सादर करावा. अर्ज सादर करण्याची शेवटची दि. ३१/०३/२०२१ रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील.

उपरोक्त जाहिरातीनुसार प्राप्त अर्ज नाकारण्याचा अथवा जाहिरात रद्द करण्याचा हक्क मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्याकडे राखीव ठेवण्यात आला आहे.

स्वाक्षरी/-XXX
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
राज्य आरोग्य हमी सोसायटी